# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.02.2025** **वार- सोमवार**

---

**एसटी-एचएसआरपी**

राज्य परिवहन विभागाच्या पुणे विभागातील सुमारे 300 बस गाड्यांना आता एच एस आर पी म्हणजे हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसवण्यात येणार आहेत. यासंदर्भातील हालचाली प्रशासन पातळीवर सुरू झाल्या असून लवकरच एस. टी. प्रवाशांचा प्रवास अधिकाधिक सुरक्षित होणार आहे. शहरातील सर्व वाहनचालकांकडून शासनाने दिलेल्या मुदतीत आपल्या वाहनाला एचएसआरपी बसवण्याचे नियोजन सुरू झाले आहे. परिवहन विभागानं 31 मार्च या दिलेल्या मुदतीपर्यंत वाहनांना नंबर प्लेट बसविणे शक्य नसल्यानं त्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार 30 एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, यानंतर गाड्या नोंदणी करतेवेळीच या पाट्या बसवल्या जाणार आहेत. अशी माहिती  पुणे विभागाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांनी दिली.

**शिवजन्मोत्सव**

पुण्यातील शिवजयंती महोत्सव समिती तर्फे दर वर्षी प्रमाणे शिवजयंतीला म्हणजे 19 फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता लालमहाल इथून 'शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा' या मिरवणुकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या मिरवणुकीत एकंदर 96 स्वराज्यरथ आणि ढोलताशा पथकं सहभागी होणार आहेत. तसंच शिवकालीन युद्धकला सादर करणाऱ्या 51 रणरागिनी मर्दिनी युद्धकला सादर करणार आहेत. समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी ही माहिती दिली.

**पुरस्कार**

आपल्या पारंपरिक ज्ञानशाखांच्या पुनरुज्जीवनासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजेत. असे प्रतिपादन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केलं. वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण आज त्यांच्या यांच्या झालं त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सोलापूर इथले वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याच समारंभात वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल चरक पुरस्कार पुण्यातील वैद्य गुणवंत येवला, वैद्य द. वा. शेंडे रसौषधी पुरस्कार पुण्यातील वैद्या विशाखा बाक्रे, वैद्य वि. म. गोगटे वनौषधी पुरस्कार नाशिकच्या वैद्य अर्चना भास्करवार यांना प्रदान करण्यात आला.

**पिफ**

ओटीटी आले असले तरी चित्रपट महोत्सवांचे महत्त्व कायम असल्याचे मत चित्रपट समीक्षक आणि पुणे चित्रपट महोत्सवाच्या निवड समितीच्या सदस्यांनी व्यक्त केलं. 23 व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवड समिती सदस्य मीना कर्णिक, अभिजीत देशपांडे आणि सैबल चटर्जी यांनी संवाद साधला. चित्रपट महोत्सव केवळ सिनेमांच्या प्रदर्शनासाठी नसून, त्यातून व्यापक सांस्कृतिक आणि कलात्मक प्रभाव अधोरेखित होतो. पिफ महोत्सवांमुळे जागतिक

चित्रपटसृष्टीत भारतीय प्रादेशिक चित्रपटांचा ठसा उमटत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. या चित्रपट महोत्सवातील एका कार्यशाळेत अभिनेते बोमन इराणी यांनी काल मार्गदर्शन केलं. उत्तम अभिनेता व्हायचं असेल, तर स्वप्न समोर ठेवा आणि ते साध्य करण्यासाठी काम करा, प्रसिद्धीच्या मागे लागू नका. ती आपोआपच येईल, असा सल्ला इराणी यांनी दिला.

**स्पर्धा**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने पहिल्या वरिष्ठ ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या 22 आणि 23 फेब्रुवारी रोजी लोणीकंद मधल्या हिंद केसरी मैदानावर ही स्पर्धा होणार आहे. या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची मान्यता असलेले 6 महानगरपालिका आणि 36 जिल्हा असे 42 जिल्हा कुस्तीगीर संघ सहभागी होणार आहेत. 10 वजन गटांमध्ये सुमारे 400 कुस्तीगीर या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**राजस्थान-स्पर्धा**

राजस्थान मधल्या अलवार जिल्ह्यात नुकत्याच 44 व्या राष्ट्रिय मास्टर्स ॲथलेटिक्स मैदानी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत यश मिळवलेल्या पुणे जिल्हा मास्टर्स ॲथलेटिक्स संघटनेच्या पुरुष आणि महिला खेळाडूंचा पुण्यात सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाला विजेते पद मिळालं आहे.एकंदर 15 राज्यातील 1800 खेळाडूंचा या स्पर्धेत सहभाग होता.

**गिरीप्रेमी**

पुण्यातील गिरीप्रेमी इंस्टिट्यूट ऑफ माऊंटेनियरिंग संस्थेचा दहावा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या समारंभाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर आदि उपस्थित होते. पुण्यात अशा दर्जेदार संस्थेची स्थापना होऊन ती जागतिक स्तरावर नावारूपाला येत आहे. हे सर्व पुणेकरांसाठी अभिमानास्पद आहे अशा शब्दांत मुरलीधर मोहोळ यांनी संस्थेचा गौरव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल 36 तर किमान 12 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये विविध भारतीच्या पुणे केंद्रांवर नमस्कार.**